

# मेंदूच्या टयूमरची शस्त्रक्रिया -

## ही खरोखर इतकी भीतीदायक आहे का?

**डॉ.दिपू बॅनर्जी**
कन्सल्टंट न्यूरोसर्जन,
वोक्हार्ट हॉस्पिटल
WOCKHARDT HOSPITALS

**परिचय :-**

मेंदूचा टयूमर- हया शब्दामुळेच ज्या व्यक्तिला तो झाला आहे अशा व्यक्तिच्या मनात भीती निर्माण होते. एकेकाळी तो अतिशय भीतीदायक समजला जात होता.परंतु आज तंत्रज्ञानाचा विकास झाल्यामुळे आणि मेंदूच्या टयूमरबद्दल हळूहळू वैज्ञानिक माहिती उघड होत असल्यामुळे,रुग्ण आणि त्यांचे कुटुंबिय अधिक आशा असलेल्या भविष्याची अपेक्षा करु शकतात.

**मेंदूचा टयूमरची शस्त्रक्रिया - ही खरोखर इतकी भीतीदायक आरोग्याची समस्या आहे का?**

होय आणि नाही. पहिले नाही, कारण ब्रेन टयूमर होऊ नये हयासाठी प्रतिबंधक उपाय काही नाहीत. तो कोणालाही होऊ शकतो - श्रीमंत किंवा गरिब,पौष्टिक आहार कमी झालेल्या किंवा पौष्टिक आहार अधिक झालेल्या,गोरे-काळे-तपकिरी किंवा पिवळे,तो जवळजवळ सर्वच भौगोलिक प्रांतामध्ये सारखाच परिणाम करतो आणि जात,धर्म,लिंग आणि जेवणाच्या सवयी काहीही असल्या तरी सुध्दा तो परिणाम करतो. परंतु ठराविक प्रकारच्या टयूमरचा ठराविक वयोगटात परिणाम होतो.होय का! कारण आपल्यापाशी भारतात लोकसंख्येवर आधारित सांख्यिकी माहिती उपलब्ध नसली तरी यूएसए मधील अहवालावरुन असे दिसून येते की दरवर्षी सुमारे ४०००० रुग्णांना नविन प्राथमिक किंवा दुय्यम मेंदूचा टयूमर झाल्याचे निदान केले जाते आणि १००००० लोकसंख्येमधे १४ घटना दरवर्षी घडतात. यूएसए मधे वाढलेले जीवनमान हे कदाचित दुय्यम किंवा दुरच्या कर्करोग मेंदूत पसरणे हयाचे प्रमाण वाढण्याचे कारण असू शकते. भारतातील परिस्थितीचे गांभिर्य लक्षात येण्यासाठी आपल्याला हया संख्येला ४ ने गुणण्याची गरज आहे.

**मेंदूचा टयूमर - हयाची भीती का वाटते?**

फुफ्फुसे आणि स्तन हयांच्या कर्करोगाहून हया घटना जरी कमी होत असल्या तरी त्यामुळे येणारे अपंगत्व हे अधिक प्रमाणात आहे.सुमारे १२० हून अधिक मेंदूच्या टयूमरचे प्रकार आहेत,व त्यामुळे परिणामकारक उपचार अधिक कठीण होतात. मेंदूचे टयूमर्स हे स्मरणशक्ती, भावना,दृष्टी,आणि हालचाल यांच्या नियंत्रण केंद्रापाशी सापडत असल्यामुळे त्यांचे व्यक्तिगत शारीरिक आणि आकलन क्षमतेवर त्याचे होणारे परिणाम तो झाल्यास अतिशय भयानक असतात. निदान होण्यास उशिर होणे हे अपंगत्व किंवा मृत्युचे मुख्य कारण असते.

**मेंदूचा टयूमरचे निदान करणे कठिण असते-**

मेंदूच्या टयूमरची लक्षणे संदिग्ध असल्यामुळे त्याचे निदान करणे कठिण असते- उदा.डोकेदुखी,उलटया,दृष्टिच्या आणि ऐकण्याच्या बाबतीतील समस्या,वर्तनविषयक समस्या, संभाषण आणि स्मरणशक्तीच्या समस्या आणि अगदी फेफरे हयाकडे कित्येक वेळा दुर्लक्ष केले जाते. ही लक्षणे मेंदूच्या टयूमरशी खास निगडीत नसल्यामुळे खूप उशिर होईपर्यंत इतर रोगांसाठी त्याबद्दल सहज सभ्रम होतो. हयापैकी कोणतीही लक्षणे अधिक काळ पर्यंत राहिली तर त्यासाठी तज्ञांचे मत घेणे महत्वाचे असते. सर्व मेंदूच्या टयूमरवर उपचार करता येत नाहीत असे नाही.

परंतु खूप घाबरून जाण्याचे काही कारण नाही. कारण ५०% टयूमर्स सौम्य स्वरूपाचे असतात आणि बाकीचे २५%हे कमी माफक प्रमाणात धोकादायक असतात आणि बरे होऊ शकतात किंवा जर शस्त्रक्रियेव्दारे संपूर्ण किंवा जवळजवळ संपूर्ण काढून टाकण्यात आला तर कित्येक वर्ष तो नियंत्रणात राहतो. शस्त्रक्रियेव्दारे काढून टाकणे जितके सुरक्षितपणे शक्य होईल तितके जास्तीत जास्त टयूमर काढून टाकणे, हे बहुतेक मेंदूच्या टयूमरसाठी प्राथमिक उपचार आहेत. फक्त सुमारे २५% हे अधिक प्रमाणात कर्क रोगकारक असतात आणि सर्व प्रकारचे उपचार केले तरी त्याचे निष्पन्न चांगले नसते. काही सौम्य प्रकारच्या टयूमरचे निदान जर लवकर करण्यात आले तर शस्त्रक्रिया न करण्याच्या गामा नाईफ आणि स्टिरिओटॅक्टिक रेडिओथेरपीसारख्या पर्यायांव्दारे त्यावर नियंत्रण ठेवता येऊ शकते.

**न्यूरोसर्जरी- भीतीवर मात करणे -**

मेंदूच्या शस्त्रक्रिया प्रत्येकात खूप प्रमाणात भीती निर्माण करत राहते, अगदी शांत राहू शकणा-या व्यक्तींना देखील त्यामुळे भीती वाटते. कदाचित मागील ४० वर्षामध्ये मेंदूच्या शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे ही भीती कमी होऊ शकते. हयापैकी काही खाली नमूद करण्यात आल्या आहेत.

★निदानात्मक अचूकतेमुळे सर्जनना अचूकतेने काम करता येते जेथे त्यांना प्रत्येक वेळी आश्चर्यकारक परिणामकारकता आणि